Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

प्राधिकृत प्रकाशन

वर्ष १२, अंक २३] गुरूवार ते बुधवार, जुलै १६-२२, २०२६/आषाढ २५-३१, शके १९४८ [पृष्ठे १२८, किंमत : रुपये ११.००

स्वंतत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

भाग एक-अ-नागपूर विभागीय पुरवणी

————————

(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.

————————

भाग १-अ (ना .वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १४९.

आयुक्त, महानगरपालिका, यांजकडून

वाचा :- (१) उपसचिव (नवि-१४), नगर विकास यांचे पत्र क्र.अशसे-२०२४- प्र.क्र.१२८-नवि -१४, दिनांक १२ जून २०२५.

(२) सहायक आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांचे पत्र क्र. NMC-FIRE-OWL-२०२५-२६-२८९११, दिनांक १० ऑक्टोबर, २०२५.

(३) शासन निर्णय क्र. नामपा २०१६-प्र.क्र.१८-नवि-२६, दिनांक ०३ मे, २०१६.

(४) शासन निर्णय क्र. नामपा- २०१५- १६५२ - प्र.क्र. १६६- नवि-२६, दिनांक १२ मे, २०१७.

(५) शासन निर्णय क्र. नामपा- २०१५- १६५२ - प्र.क्र. १६६- नवि-२६, दिनांक १८ मार्च, २०२१.

(६) शासन निर्णय क्र. नामपा – १२२४-प्र.क्र.१५७-नवि-२६, दिनांक ९ जून २०२६.

सुधारित आदेश

क्रमांक आस्थापना-२९९-२०२६.—

शासन निर्णय क्र. नामपा- २०१५/१६५२/ प्र. क्र. १६६/ नवि-२६, दिनांक १२ मे, २०१७ अन्वये नागपूर महानगरपालिकेच्या अग्निशमन व आणिबाणी सेवा विभागाचा सेवाप्रवेश नियमास प्राप्त मान्यते नुसार अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण, भाग एक-अ, नागपूर विभागीय पुरवणी, दिनांक १९ मे, २०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आली.

यानंतर सुधारित शासन निर्णय क्र. नामपा- २०१५/ १६५२ / प्र.क्र. १६६/ नवि-२६, दिनांक १८ मार्च, २०२१ अन्वये झालेल्या सुधारणा बाबतची अधिसूचना भाग एक-अ, नागपूर विभागीय पुरवणी, दिनांक मे ६-१२, २०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आली .

तथापि, संदर्भ क्र.(६) शासन निर्णय क्र. नामपा – १२२४/प्र.क्र.१५७/नवि-२६, दिनांक ९ जून, २०२६ अन्वये क्र.(०४) शासन निर्णयातील नियम क्र.१ ,२ व जोडपत्र -२ , अनुसूची-अ अधिक्रमित करण्यात आलेली आहे. (या नियमातील अधिक्रमित करण्यात आलेले नियम व जोडपत्र वगळून इतर नियम व जोडपत्र कायम राहतील.)

तसेच, सुधारित शासन निर्णय क्रमांकः नामपा- १२२४ / प्र.क्र.१५७/नवि-२६, दिनांक ९ जून, २०२६ अन्वये "नागपूर महानगरपालिका, अग्निशमन व आपात्कालीन सेवा विभाग (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२६" यांचा विचार करून आदर्श सामाईक सेवा प्रवेश नियमांच्या प्रारुप मसुद्यानुसार त्यात आवश्यक त्या सुधारणा करून सुधारित नियमावलीस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ४५४, ४५५ व ४६५ (१) (ल) अन्वये प्राप्त अधिकारानुसार, या आदेशान्वये शासन मान्यता देण्यात येत आहे. यानुसार सुधारित शासन निर्णयातील परिशिष्ट-अ व परिशिष्ट-ब जोडपत्र-२ अनुसूची -अ खालीलप्रमाणे प्रसिध्द करण्यात येत आहे.

परिशिष्ट-अ

नागपूर महानगरपालिका, अग्निशमन व आपात्कालीन सेवा विभाग (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२६

१. **संक्षिप्त नाव व प्रारंभः** (१) या नियमांना "नागपूर महानगरपालिका, अग्निशमन व आपात्कालीन सेवा विभाग (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२६" म्हणून संबोधण्यात येईल.

(२) सदर नियम शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

२. **व्याख्या :**

या विनियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तरः-

अ) "महानगरपालिका" म्हणजे नागपूर महानगरपालिका.

आ) "अधिनियम" म्हणजे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९.

इ) "शासन" म्हणजे महाराष्ट्र शासन.

ई) "नगर विकास विभाग" याचा अर्थ महाराष्ट्र कार्यनियमावलीच्या पहिल्या अनुसूची मध्ये विनिर्दिष्ट केलेला नगर विकास विभाग असा आहे ;

उ) "संचालनालय" याचा अर्थ नगर विकास विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील महाराष्ट्र अग्निशमन व आपात्कालीन सेवा संचालनालय असा आहे.

ऊ) "महापौर" म्हणजे नागपूर महानगरपालिकेचे महापौर,

ऋ) "नियुक्ती प्राधिकारी" याचा अर्थ उमेदवारास महानगरपालिका सेवेतील संबंधित पदावर नियुक्ती देण्यास प्राधिकृत असलेले सक्षम प्राधिकारी ;

ए) "आयुक्त" म्हणजे अधिनियमातील कलम ३६ अन्वये शासनाने नियुक्त केलेला अधिकारी.

ऐ) "संक्षम प्राधिकारी" याचा अर्थ नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त असा होतो.

ओ) "कर्मचारी" म्हणजे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील प्रकरण ४, कलम ५१ पोट-कलम (४) अन्वये नेमणूक केलेला कोणताही एक अधिकारी व कर्मचारी परंतू यात रोजंदारीवर, हजेरीपटावर असलेले कामगार आणि कंत्राटी पध्दतीने तसेच अंशकालीन व मानद स्वरुपी नेमण्यात आलेल्या व्यक्तींचा समावेश होत नाही.

औ) "संवर्ग" म्हणजे स्वतंत्र घटक म्हणून मंजूर केलेली एखाद्या सेवेतील किंवा एखाद्या सेवेच्या विभागातील पदसंख्या.

अं) "कलम" म्हणजे अधिनियमाचे कलम.

क) "परिशिष्ट" म्हणजे या विनियमांना जोडलेले परिशिष्ट.

ख) "जोडपत्र" म्हणजे या विनियमांचे शेवटी जोडलेले जोडपत्रे.

ग) "अनुसूची" म्हणजे या विनियमांच्या जोडपत्र-२ ला जोडण्यात आलेली अनुसूची.

घ) "विभागीय परीक्षा" म्हणजे नागपूर महानगरपालिका अग्निशमन विभागातील आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी विहित करण्यात आलेली व या विनियमांच्या जोडपत्र-२ अनुसूची "अ" मध्ये नमूद करण्यात आलेली विभागीय परीक्षा.

च) "पदवी" याचा अर्थ सांविधिक विद्यापीठाची पदवी.

छ) "पदविका" म्हणजे संसदेच्या अधिनियमाद्वारे किंवा भारतातील राज्य विधिमंडळाद्वारे विधी संस्था असलेले कोणतेही विद्यापीठ किंवा तंत्र शिक्षण मंडळ किंवा संसदेच्या अधिनियमाद्वारे किंवा तत्सम अधिनियमाद्वारे स्थापना करण्यात आलेल्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेतून तंत्र निकेतनातून केलेली पदविका.

ज) "पदोन्नतीसाठी पात्रता" याचा अर्थ सामान्य प्रशासन विभागाने पदोन्नतीच्या पात्रतेबाबत वेळोवेळी नियम, परिपत्रक किंवा आदेश या नुसार विहित केलेल्या अटी व शर्ती या नुसारची पदोन्नतीसाठीची पात्रता ;

झ) "व्यावसायिक अर्हता" (Professional Qualification) म्हणजे, अग्निशमन अभियांत्रिकी पदवी (बी. ई. फायर) अग्निशमन अभियांत्रिकी उच्च शिक्षा पदविका (ॲडव्हान्स इन फायर इंजिनियरिंग), अग्निशमन अभियांत्रिकी पदविका, (डिप्लोमा इन फायर इंजिनियरिंग) उप अग्निशमन अधिकारी हे पाठ्यक्रम [राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर किंवा राज्य अग्निशमन प्रशिक्षण अकादमी, मुंबई मधुन उत्तीर्ण झालेले अथवा इंस्टीट्यूट ऑफ फायर इंजिनिअर्स यूके / इंडिया या संस्थेमधून एम.आय. (फायर) किंवा ग्रेड (१) (फायर) उत्तीर्ण झालेले]

ट) "स्वीयेतर सेवा" (Foreign Service) म्हणजे ज्या सेवेत नागपूर महानगरपालिका नागपूर, अग्निशमन व आपात्कालीन सेवा विभागातील कर्मचाऱ्याला त्यांचे वेतन व भत्ते महानगरपालिकेच्या निधी व्यतिरिक्त अन्य कोणत्याही साधानाद्वारे मिळतात अशी सेवा.

ठ) "मुलाखत" म्हणजे याचा अर्थ, नागपूर महानगरपालिका नागपूर, अग्निशमन व आपात्कालीन सेवा विभागामध्ये असलेल्या पदावरील / पदांवरील नियुक्तीकरीता अर्ज केलेल्या उमेदवाराची सक्षम निवड प्राधिकाऱ्याने किंवा त्याच्या स्वतःच्या सदस्यांमधून अशा प्राधिकरणाने नामनिर्देशित केलेल्या एखाद्या समितीने आणि ज्या पदांकरिता त्यांने किंवा तिने अर्ज केला आहे त्या पदांवरील नियुक्तीकरिता निवड करण्यासाठी अशा रितीने मुलाखत घेण्यात आलेल्या उमेदवारांची योग्यता किंवा अन्यथा मूल्यमापन करण्याच्या उद्देशाने आणि अशा मुलाखत घेण्यात आलेल्या उमेदवारांना मिळालेल्या गुणांच्या आधारे अनुक्रम लावण्यासाठी घेतलेली मुलाखत, असा आहे.

ड) "समतुल्य / समकक्ष अर्हता" म्हणजे, संबंधित अर्हतेला समान म्हणून शासनाकडून जाहीर केलेली अर्हता असे आहे आणि याबाबत कोणताही संदेह / वाद उद्‌भवल्यास शासनाचा निर्णय अंतिम असेल.

ढ) "मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्था" म्हणजे, शासनाची मान्यता असलेली संस्था असे आहे.

ण) "माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा" म्हणजे, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात येत असलेली शालांत प्रमाणपत्र परीक्षा असे आहे आणि यात शासनाने या परीक्षेशी समान म्हणून जाहीर केलेल्या कोणत्याही इतर परिक्षेचा समावेश आहे.

त) औद्योगिक प्रशिक्षण संस्था म्हणजे राज्य शासनाने विविध प्रकारच्या औद्योगिक व्यवसायाचे प्रशिक्षण देण्यासाठी शासनाने तयार केलेले औद्योगिक प्रशिक्षण केंद्र.

थ) "समय श्रेणी वेतन" म्हणजे असे वेतन जे, या विनियमात घालून देण्यात आलेल्या कोणत्याही शर्तीच्या अधिन किमान पासून कमाल पर्यंत नियतकालिक वेतनवाढीने वाढते.

द) "लेखी परीक्षा" म्हणजे नागपूर महानगरपालिका नागपूर, अग्निशमन व आपात्कालीन सेवा विभागाकडून योग्य रितीने नामनिर्देशित करण्यात आलेल्या एखाद्या अभिकरणाकडून, पदाकरिता अर्ज करणाऱ्या उमेदवारांच्या योग्यतेचे किंवा अन्यथा मूल्यमापन करण्याच्या प्रयोजनाकरिता, घेतलेली परीक्षा आणि त्या लेखी परीक्षेतील उमेदवारांच्या कामगिरीचा संबंध असेल तेथवर त्यांच्या गुणवत्तेचा क्रम लावण्याच्या उद्देशाने घेतलेली परीक्षा असा आहे.

ध) व्यावसायीक परीक्षा म्हणजे उमेदवारांचे तांत्रिक कौशल्याचे मूल्यमापन करण्यासाठी नागपूर महानगरपालिका एखाद्या अभिकरणाकडून अथवा शासकीय / निमशासकीय कार्यालयामार्फत आयोजित केलेली परीक्षा असा आहे.

न) "निवड समिती" याचा अर्थ, महानगरपालिकेतील, गट-अ ते गट-क पदांवर सरळसेवेने नियुक्ती देण्याकरीता गठीत केलेली समिती;

प) "निवड समिती अध्यक्ष" म्हणजे निवड समितीसाठी सक्षम प्राधिकारी यांनी निवड समिती अध्यक्ष म्हणून नियुक्त केलेले अधिकारी.

फ) "अग्निशमन अभियांत्रिकी पदवी (बी. ई. फायर)" याचा अर्थ राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय (एनएफएससी), नागपूर किंवा अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषदेशी संलग्न मान्यता प्राप्त विद्यापीठ (एआयसीटीई) यांच्याकडील अग्निशमन हा मुख्य विषय अग्निशमन अभियांत्रिकी पूर्ण केलेली पदवी असा आहे.

ब) "अग्निशमन प्रगत पदविका" याचा अर्थ राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय (एनएफएससी), नागपूर यांच्याकडील विभागीय अग्निशमन अधिकारी हा पाठ्यक्रम उत्तीर्ण असा आहे.

भ) "अग्निशमन पदविका" याचा अर्थ राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय (एनएफएससी), नागपूर यांच्याकडील अग्निशमन केंद्र अधिकारी व इंस्ट्रक्टर हा पाठ्यक्रम उत्तीर्ण असा आहे.

म) "उप अग्निशमन अधिकारी पाठ्यक्रम" याचा अर्थ राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय (एनएफएससी), नागपूर यांच्याकडील उप अग्निशमन अधिकारी पाठ्यक्रम किंवा महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी (एमएफएसए), मुंबई यांच्याकडील एक वर्ष कालावधीचा उप स्थानक अधिकारी व अग्नि प्रतिबंधक अधिकारी हा पाठ्यक्रम उत्तीर्ण असा आहे.

य) "श्रेणी-एक (अग्निशमन इंडिया)" याचा अर्थ, भारतीय अग्निशमन अभियांत्रिकी संस्था, नवी दिल्ली यांच्याकडील श्रेणी-एक परीक्षा दिनांक ३१-०५-२०१३ पूर्वी उत्तीर्ण असा आहे.

र) "श्रेणी-एक (अग्निशमन यु.के.)" याचा अर्थ, अग्निशमन अभियांत्रिकी संस्था, युनाईटेड किंगडम यांच्याकडील श्रेणी-एक परीक्षा दिनांक ०३-११-२०१७ पूर्वी उत्तीर्ण असा आहे.

ल) "एम.आय. (अग्निशमन इंडिया)" याचा अर्थ, भारतीय अग्निशमन अभियांत्रिकी संस्था, नवी दिल्ली यांच्याकडील सदसत्व परीक्षा दिनांक ३१-०५-२०१३ पूर्वी उत्तीर्ण असा आहे.

व) "एम.आय. (अग्निशमन यु.के.)" याचा अर्थ, युनाईटेड किंगडम, अग्निशमन अभियांत्रिकी संस्था यांच्याकडील सदस्यत्व परीक्षा दिनांक ०३-११-२०१७ पूर्वी उत्तीर्ण असा आहे.

श) "अग्निशामक पाठ्यक्रम" याचा अर्थ, महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी (एमएफएसए), मुंबई किंवा राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, मुंबई यांच्याकडील अग्निशमन प्रशिक्षण पाठ्यक्रम उत्तीर्ण असा आहे किंवा महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय यांच्याकडून मान्यताप्राप्त खाजगी संस्थेकडून सहा महिन्याचा अग्निशमन पाठ्यक्रम उत्तीर्ण असलेला. (नागपूर महानगरपालिकेच्या अग्निशमन व आपात्कालीन सेवा विभागात सदर अभ्यासक्रम पूर्ण न केलेल्या व कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना अभ्यासक्रम पूर्ण करण्याकरिता हे नियम लागू झाल्यापासून २ वर्षांचा कालावधी देण्यात येत आहे)

परिशिष्ट - ब

नागपूर महानगरपालिका, नागपूर

अग्निशमन व आपात्कालीन सेवा विभागातील अधिकारी/ कर्मचारी (वर्गीकरण, सेवाभरती व पदोन्नती) विनियम, २०२६.

जोडपत्र-२, अनुसूची-अ

अ. क्र.	पदनाम	आकृतीबंधानुसार मंजूर पदे	नेमणूकीची पध्दत व टक्केवारी १. नामनिर्देशन / सरळसेवेने २. पदोन्नती ३. प्रतिनियुक्ती	संचालक, अग्निशमन सेवा यांच्या प्रस्तावानुसार असलेले सेवाप्रवेश नियम
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१	मुख्य अग्निशमन अधिकारी (Chief Fire Officer) (गट-अ)	०१	१००% पदोन्नतीने किंवा प्रतिनिुक्ती (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास)	**(अ) पदोन्नती :** उप मुख्य अग्निशमन अधिकारी, गट-अ या पदावर तीन वर्षापेक्षा कमी नसलेली सलग नियमित सेवा झालेल्या व खालील शैक्षणिक पात्रता धारण करणाऱ्या योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने :- (१) पदोन्नतीच्या पदाकरीता खालील नमूद कोणतीही एक शैक्षणिक अर्हता आवश्यक असेल, i. कोणत्याही शाखेतील पदवी आणि अग्निशमन प्रगत पदविका किंवा "एम.आय. (अग्निशमन-यु.के.)" किंवा "एम. आय. (अग्निशमन-इंडिया)". किंवा ii. अग्निशमन अभियांत्रिकी या विषयात किंवा त्यापेक्षा उच्च शैक्षणिक अर्हताधारण करीत असलेली व्यक्ती. (२) महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार मराठी व हिंदी भाषेची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक. (३) महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार संगणक अर्हता प्रचालन प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक. **(ब) प्रतिनियुक्ती:** पदोन्नतीने अधिकारी उपलब्ध होईपर्यंत खालील अनुभव असलेल्या अधिकाऱ्यांमधून प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात येईल:- i. महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालयामध्ये सहायक संचालक / सहाय्यक समादेश अधिकारी (प्रशिक्षण) किंवा समकक्ष पदावर / समकक्ष वेतनश्रेणीत कार्यरत असलेले अधिकारी.; किंवा ii. महानगरपालिका किंवा विशेष नियोजन प्राधिकरण/ शासकीय / निम शासकीय अग्निशमन सेवेमध्ये मुख्य अग्निशमन अधिकारी किंवा समकक्ष पदावर / वेतनश्रेणीत कार्यरत असलेले अधिकारी. (३) मराठी भाषेतून प्रशासकीय कामकाज करता यावे यासाठी मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे. (लिहिणे,वाचणे व बोलणे).

अनुसूची-अ—चालू

(१)	(२)	(३)	(४)	(५)
२	उप मुख्य अग्निशमन अधिकारी (Deputy Chief Fire Officer) (गट-अ)	०१	१००% पदोन्नतीने किंवा प्रतिनियुक्ती (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास)	**(अ) पदोन्नतीः** विभागीय अग्निशमन अधिकारी, या पदावर तीन वर्षापेक्षा कमी नसलेली सलग नियमित सेवा झालेल्या व खालील शैक्षणिक पात्रता धारण करणाऱ्या योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने :- (१) पदोन्नतीच्या पदाकरीता खालील नमूद कोणतीही एक शैक्षणिक अर्हता आवश्यक असेल, i. कोणत्याही शाखेतील पदवी आणि अग्निशमन प्रगत पदविका किंवा "एम.आय.(अग्निशमन-यु.के.)" किंवा एम.आय. (अग्निशमन-इंडिया)" किंवा ii. अग्निशमन अभियांत्रिकी या विषयात किंवा त्यापेक्षा उच्च शैक्षणिक अर्हताधारण करीत असलेली व्यक्ती. (२) महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार मराठी व हिंदी भाषेची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक (३) महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार संगणक अर्हता प्रचालन प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक **(ब) प्रतिनियुक्तीः** पदोन्नतीने अधिकारी उपलब्ध होईपर्यंत खालील अनुभव असलेल्या अधिकाऱ्यांमधुन प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात येईलः- महानगरपालिका किंवा विशेष नियोजन प्राधिकारण/ शासकीय / निमशासकीय अग्निशमन सेवेमध्ये उप मुख्य अग्निशमन अधिकारी किंवा समकक्ष पदावर/ वेतनश्रेणीत कार्यरत असलेले अधिकारी.
३	विभागीय अग्निशमन अधिकारी (Divisional Fire Officer) (गट-ब)	०२	१. नामनिर्देशन/ सरळसेवेने - २०% २. पदोन्नती - ८०% ३. प्रतिनियुक्ती (पदोन्नतीने नियुक्ती देण्याकरीता योग्य उमेदवार उपलब्ध नसतील तर, नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या सहमतीने त्या विशिष्ट भरती वर्षासाठी पदोन्नती व नामनिर्देशन याद्वारे करावयाच्या नियुक्तीचे प्रमाण शिथिल करून सदर पदे नामनिर्देशनाद्वारे भरता येतील)	या पदावरील नियुक्त्या पुढील मार्गाने करण्यात येतील.- **(अ) पदोन्नती** सहाय्यक विभागीय अग्निशमन अधिकारी या पदावर तीन वर्षापेक्षा कमी नसलेली सलग नियमित सेवा झालेल्या व पोट-कलम (ब) मधील खंड (२) मध्ये नमूद पात्रता धारण करणाऱ्या योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने **(ब) नामनिर्देशन** आयोग/ निवड समिती यांच्यामार्फत घेण्यात येणाऱ्या स्पर्धात्मक परिक्षेच्या निकाला आधारे शिफारस करण्यात आलेल्या व खालील अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारामधून नामनिर्देशनाद्वारे १) वयोमयादा :- किमान वयोमयादाः अठरा वर्षे पूर्ण. कमाल वयोमर्यादाः खुल्या प्रवर्गातील व्यक्तींसाठी वयाच्या ३८ वर्षापेक्षा कमी व मागासवर्गीय प्रवर्गातील व्यक्तीसाठी ४३ वर्षापेक्षा कमी २) शैक्षणिक पात्रता : i. कोणत्याही शाखेतील पदवी आणि अग्निशमन प्रगत पदविका किंवा "श्रेणी-एक. (अग्निशमन यु.के.)" किंवा "श्रेणी-एक (अग्निशमन-इंडिया)" किंवा ii.अग्निशमन अभियांत्रिकी या विषयात किंवा त्यापेक्षा उच्च शैक्षणिक अर्हताधारण करीत असलेली व्यक्ती.

अनुसूची-अ—चालू

(१)	(२)	(३)	(४)	(५)

iii. महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार मराठी व हिंदी भाषेची परीक्षा उर्तार्ण होणे आवश्यक

iv.महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार संगणक अर्हता प्रचालन प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक

(३) शारिरीक अर्हताः

i. उंची : किमान १६५ से.मी. (पुरुष) व किमान १५७ से.मी. (महिला),

ii. वजनः किमान ५० कि. ग्रॅ. (पुरुष) व किमान ४६ कि.ग्रॅ. (महिला),

iii. छातीः किमान ८१ से.मी. (साधारण) व किमान ८६ से.मी. (फुगविल्यानंतर) (महिला उमेदवारांसाठी लागू नाही.)

(४) विभागीय अग्निशमन अधिकारी या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त होणाऱ्या उमेदवारांस प्रथम २ वर्षाकरिता "सहायक विभागीय अग्निशमन अधिकारी" या पदावर परिविक्षाधीन कालावधीत नियुक्ती देऊन परिविक्षाधीन कालावधी पूर्ण झाल्यानंतर विभागीय अग्निशमन अधिकारी या पदावर पदस्थापना देण्यात येईल.

(५) नामनिर्देशनाने नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने प्रशिक्षण पूर्ण करून, विहित केलेली असल्यास विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

(६) नामनिर्देशनाने नियुक्त होण्यासाठी शिफारस होणाऱ्या व्यक्तीने, महाराष्ट्र नागरी सेवा (छोटे कुटुंब घोषणापत्र) नियम, २००५ अथवा शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या नियम आदेश अथवा संलेखानुसार छोट्या कुटुंबाबाबत घोषणापत्र सादर करणे आवश्यक आहे. छोटे कुटुंब घोषणापत्र सादर करण्याच्या दिनांकास दोन अपत्यांपेक्षा जास्त असणारी व्यक्ती शासकीय सेवेत नियुक्ती मिळण्यास अपात्र असेल. शासकीय सेवेत नियुक्ती मिळाल्यानंतर एखाद्या व्यक्तीस नियुक्तीच्या वेळेस अथवा त्यानंतर दोन पेक्षा जास्त अपत्ये असल्याचे सिध्द झाल्यास शासन सेवेतील सदर पदावर कार्यरत राहण्यासाठी अपात्र ठरविण्यात येईल.

(क) प्रतिनियुक्तीः

पदोन्नतीने /नामनिर्देशनाने अधिकारी उपलब्ध होईपर्यंत खालील अनुभव असलेल्या अधिकाऱ्यांमधून प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात येईलः-

महानगरपालिका किंवा विशेष नियोजन प्राधिकारण/ शासकीय / निमशासकीय अग्निशमन सेवेमध्ये विभागीय अग्निशमन अधिकारी किंवा समकक्ष पदावर/ वेतनश्रेणीत कार्यरत असलेले अधिकारी.

अनुसूची-अ—चालू

(१)	(२)	(३)	(४)	(५)
४	सहायक विभागीय अग्निशमन अधिकारी (Asst. Divisional Fire Officer) (गट-ब)	०४	१००% पदोन्नतीने किंवा प्रतिनियुक्ती (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास)	या पदावरील नियुक्त्या पुढील मार्गाने करण्यात येतील.- **(अ) पदोन्नती:** अग्निशमन केंद्र अधिकारी किंवा समकक्ष पदावर तीन वर्षापेक्षा कमी नसलेली सलग नियमित सेवा झालेल्या व खाली नमूद शैक्षणिक पात्रता धारण करणाऱ्या योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने i. सांविधिक विद्यापीठाची पदवी आणि ii. अग्निशमन प्रगत पदविका किंवा ("श्रेणी-एक फायर-यु.के.) किंवा ("श्रेणी-एक फायर- इंडिया)" iii. किंवा या विषयात त्यापेक्षा उच्च शैक्षणिक अर्हता धारण करीत असलेली व्यक्ती. महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार मराठी व हिंदी भाषेची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक **(ब) प्रतिनियुक्ती** पदोन्नतीने अधिकारी उपलब्ध होईपर्यंत खालील अनुभव असलेल्या अधिकाऱ्यांमधून प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात येईल :- महानगरपालिका किंवा विशेष नियोजन प्राधिकरण/ शासकीय /निमशासकीय अग्निशमन सेवेमध्ये सहायक विभागीय अग्निशमन अधिकारी किंवा समकक्ष पदावर/ वेतनश्रेणत कार्यरत असलेले अधिकारी.
५	अग्निशमन केंद्र अधिकारी (Station Officer) (गट-ब)	१५	१) नामनिर्देशन - २५% २) पदोन्नती - ७५% (पदोन्नतीने नियुक्ती देण्याकरीता योग्य उमेदवार उपलब्ध नसतील तर, नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या सहमतीने त्या विशिष्ट भरती वर्षासाठी पदोन्नती व नामनिर्देशन याद्वारे करावयाच्या नियुक्तीचे प्रमाण शिथिल करून सदर पदे नामनिर्देशनाद्वारे भरता येतील.)	या पदावरील नियुक्त्या पुढील मार्गाने करण्यात येतील.- **(अ) पदोन्नतीः** सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी या पदावर तीन वर्षापेक्षा कमी नसलेली सलग नियमित सेवा झालेल्या व पोट-कलम (ब) मधील खंड (२) मध्ये नमूद शैक्षणिक पात्रता धारण करणाऱ्या योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने ; **(ब) नामनिर्देशन :** आयोग/ निवडसमिती यांच्यामार्फत घेण्यात येणाऱ्या स्पर्धात्मक परिक्षेच्या निकाला आधारे शिफारस करण्यात आलेल्या व खालील अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारामधून नामनिर्देशनाद्वारेः- (१) वयोमर्यादा :- i. किमान वयोमर्यादाः अठरा वर्षे पूर्ण. ii. कमाल वयोमर्यादा : खुल्या प्रवर्गातील व्यक्तींसाठी वयाच्या ३८ वर्षापेक्षा कमी व मागासवर्गीय प्रवर्गातील व्यक्तीसाठी ४३ वर्षापेक्षा कमी : (२) शैक्षणिक पात्रताः i. सांविधिक विद्यापीठाची पदवी आणि अग्निशमन पदविका किंवा "श्रेणी-एक. (फायर-यु.के.)" किंवा "श्रेणी-एक (फायर-इंडिया)" किंवा या विषयात त्यापेक्षा उच्च शैक्षणिक अर्हता धारण करीत असलेली व्यक्ती. ii. महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार मराठी व हिंदी भाषेची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक. iii महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार संगणक अर्हता प्रचालन प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक. (३) शारिरिक अर्हता : i. उंचीः किमान १६५ से.मी. (पुरुष) व किमान १५७ से.मी. (महिला),

अनुसूची-अ—चालू

(१)	(२)	(३)	(४)	(५)
				ii. वजनः किमान ५० कि.ग्रॅ. (पुरुष) व किमान ४६ कि.ग्रॅ. (महिला), iii छातीः किमान ८१ से.मी. (साधारण) व किमान ८६ से.मी. (फुगविल्यानंतर) (महिला उमेदवारांसाठी लागू नाही). iv. दृष्टी ६/६ (चष्माशिवाय) (४) अग्निशमन केंद्र अधिकारी या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त होणाऱ्या उमेदवारांस प्रथम २ वर्षाकरिता "उप अग्निशमन अधिकारी" या पदावर परिविक्षाधीन कालावधीत नियुक्ती देऊन परिविक्षाधीन कालावधी पूर्ण झाल्यानंतर अग्निशमन केंद्र अधिकारी या पदावर पदस्थापना देण्यात येईल. (५) नामनिर्देशनाने नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने प्रशिक्षण पूर्ण करून, विहित केलेली असल्यास विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. (६) नामनिर्देशनाने नियुक्त होण्यासाठी शिफारस होणाऱ्या व्यक्तीने, महाराष्ट्र नागरी सेवा (छोटे कुटुंब घोषणापत्र) नियम, २००५ अथवा शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या नियम आदेश अथवा संलेखानुसार छोट्या कुटुंबाबाबत घोषणापत्र सादर करणे आवश्यक आहे. छोटे कुटुंब घोषणापत्र सादर करण्याच्या दिनांकास दोन अपत्यांपेक्षा जास्त असणारी व्यक्ती शासकीय सेवेत नियुक्ती मिळण्यास अपात्र असेल. शासकीय सेवेत नियुक्ती मिळाल्यानंतर एखाद्या व्यक्तीस नियुक्तीच्या वेळेस अथवा त्यानंतर दोन पेक्षा जास्त अपत्ये असल्याचे सिद्ध झाल्यास शासन सेवेतील सदर पदावर कार्यरत राहण्यासाठी अपात्र ठरविण्यात येईल. **(क) प्रतिनियुक्तीः** पदोन्नतीने/नामनिर्देशनाने अधिकारी उपलब्ध होईपर्यंत खालील अनुभव असलेल्या अधिकाऱ्यांमधुन प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात येईलः- महानगरपालिका / नगरपरिषदांच्या अग्निशमन सेवेमध्ये अग्निशमन केंद्र अधिकारी किंवा समकक्ष पदावर / वेतनश्रेणीत सेवा करत असलेले अधिकारी.
६	सहायक अग्निशमन केंद्र अधिकारी (Asst. Station Officer) (गट-क)	३९	पदोन्नती - १००%	या पदावरील नियुक्त्या पुढील मार्गाने करण्यात येतील.- **पदोन्नतीः** (१) उप अग्निशमन अधिकारी, या पदावर तीन वर्षापेक्षा कमी नसलेली सलग नियमित सेवा झालेल्या खालील नमुद शैक्षणिक पात्रता धारण करणाऱ्या योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने,ः (२) शैक्षणिक पात्रता : सांविधिक विद्यापीठाची पदवी आणि उप अग्निशमन अधिकारी पाठ्यक्रम किंवा "श्रेणी-एक. (फायर-यु. के.)" किंवा "श्रेणी-एक (फायर-इंडिया)" किंवा या विषयात त्यापेक्षा उच्च शैक्षणिक अर्हता धारण करीत असलेली व्यक्ती; (३) महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार मराठी व हिंदी भाषेची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक.

अनुसूची-अ—चालू

(१)	(२)	(३)	(४)	(५)
७	उप अग्निशमन अधिकारी (Sub-Officer) (गट-क)	३९	१.नामनिर्देशन - ५०% २.पदोन्नती - ५०% (पदोन्नतीने नियुक्ती देण्याकरीता योग्य उमेदवार उपलब्ध नसतील तर, नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या सहमतीने त्या विशिष्ट भरती वर्षासाठी पदोन्नती व नामनिर्देशन याद्वारे करावयाच्या नियुक्तीचे प्रमाण शिथिल करून सदर पदे नामनिर्देशनाद्वारे भरता येतील.)	या पदावरील नियुक्त्या पुढील मार्गाने करण्यात येतील.- **(अ) पदोन्नतीः** अग्निशमन प्रणेता/प्रमुख अग्निशमन विमोचक किंवा चालक यंत्र चालक या पदावर तीन वर्षांपेक्षा कमी नसलेली सलग नियमित सेवा झालेल्या व पोट-कलम (ब) मधील खंड (२) मध्ये नमुद शैक्षणिक पात्रता धारण करणाऱ्या योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने (परंतु असे की, उप अग्निशमन अधिकारी गट-क या पदावरील पदोन्नतीद्वारे नियुक्तीचे प्रमाण ८० टक्के प्रमुख अग्निशामक विमोचक गट-क संवर्गातून व २० टक्के चालक यंत्र-चालक गट-क संवर्गातून असे राहील). **(ब) नामनिर्देशन** आयोग/निवड समिती यांच्यामार्फत घेण्यात येणाऱ्या स्पर्धात्मक परिक्षेच्या निकाला आधारे शिफारस करण्यात आलेल्या व खालील अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारामधुन नामनिर्देशनाद्वारेः- (१) वयोमर्यादा :- i. किमान वयोमर्यादाः अठरा वर्षे पूर्ण. ii. कमाल वयोमर्यादाः खुल्या प्रवर्गातील व्यक्तींसाठी वयाच्या ३० वर्षांपेक्षा कमी व मागासवर्गीय प्रवर्गातील व्यक्तीसाठी ३५ वर्षांपेक्षा कमी : (२) शैक्षणिक पात्रता : i. सांविधिक विद्यापीठाची पदवी आणि उप अग्निशमन अधिकारी पाठ्यक्रम किंवा "श्रेणी-एक (फायर-यु.के.)" किंवा "श्रेणी-एक (फायर-इंडिया)" किंवा या विषयात त्यापेक्षा उच्च शैक्षणिक अर्हता धारण करीत असलेली व्यक्ती. ii. महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार मराठी व हिंदी भाषेची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार संगणक अर्हता प्रचालन प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक. (३) शारिरिक अर्हता : i. उंची : किमान १६५ से.मी. (पुरुष) व किमान १५७ सें.मी. (महिला), ii. वजन : किमान ५० कि.ग्रॅ. (पुरुष) व किमान ४६ कि.ग्रॅ.. (महिला), छाती : किमान ८१ सें.मी. (साधारण) व किमान ८६ सें.मी. (फुगविल्यानंतर) (महिला उमेदवारांसाठी लागू नाही.) iv. दृष्टी ६/६ (चष्माशिवाय) (४) पदावर नामनिर्देशनाने नियुक्त होणारी व्यक्ती ही दोन वर्षांच्या कालावधीकरीता परिविक्षाधीन राहील. सदर परिविक्षाधीन कालावधी कमाल एका वर्षाने वाढविता येईल व या पदावर नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने सदर परिविक्षाधीन कालावधी यशस्वीपणे पूर्ण करणे आवश्यक आहे. एखाद्या व्यक्तीने विहित कालावधीत परिविक्षाधीन कालावधी यशस्वीपणे पूर्ण न केल्यास अथवा नियुक्त झालेल्या पदासाठी तो अयोग्य असल्याचे आढळल्यास सदर व्यक्तीच्या सेवा समाप्त होण्यायोग्य असतील.

अनुसूची-अ—चालू

(१)	(२)	(३)	(४)	(५)
				(५) नामनिर्देशनाने नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने प्रशिक्षण पूर्ण करून, विहित केलेली असल्यास विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. (६) नामनिर्देशनाने नियुक्त होण्यासाठी शिफारस होणाऱ्या व्यक्तीने, महाराष्ट्र नागरी सेवा (छोटे कुटुंब घोषणापत्र) नियम, २००५ अथवा शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या नियम आदेश अथवा संलेखानुसार छोट्या कुटुंबाबाबत घोषणापत्र सादर करणे आवश्यक आहे. छोटे कुटुंब घोषणापत्र सादर करण्याच्या दिनांकास दोन अपत्यांपेक्षा जास्त असणारी व्यक्ती शासकीय सेवेत नियुक्ती मिळण्यास अपात्र असेल. शासकीय सेवेत नियुक्ती मिळाल्यानंतर एखाद्या व्यक्तीस नियुक्तीच्या वेळेस अथवा त्यानंतर दोन पेक्षा जास्त अपत्ये असल्याचे सिद्ध झाल्यास शासन सेवेतील सदर पदावर कार्यरत राहण्यासाठी अपात्र ठरविण्यात येईल.
८	प्रमुख अग्निशामक विमोचक (Leading Fireman Rescuer)	८१	पदोन्नती - १००%	या पदावरील नियुक्त्या पुढील मार्गाने करण्यात येतील.- **पदोन्नतीः** अग्निशमन विमोचक या पदावर तीन वर्षांपेक्षा कमी नसलेली सलग नियमित सेवा झालेल्या खाली नमुद शैक्षणिक पात्रता धारण करणाऱ्या योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने - शैक्षणिक पात्रता : i. माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण आणि अग्निशमन पाठ्यक्रम उत्तीर्ण व जड वाहन चालविण्याचा वैध परवाना ही अर्हता धारण करीत असलेली व्यक्ती; ii. महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार मराठी व हिंदी भाषेची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक. iii. महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार संगणक अर्हता प्रचालन प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक (नागपूर महानगरपालिकेच्या अग्मिशमन व आपात्कालीन सेवा विभागात "प्रमुख अग्निशामक विमोचक" या पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांना जड वाहन चालवण्याचा वैध परवाना धारण करण्याकरिता ४ वर्षांचा कालावधी देण्यात येत आहे).
९.	अग्निशामक विमोचक (Fire-man Rescuer) गट-क	५००	नामनिर्देशन - १००%	या पदावरील नियुक्त्या पुढील मार्गाने करण्यात येतीलः- आयोग/ निवड समिती यांच्यामार्फत घेण्यात येणाऱ्या स्पर्धात्मक परिक्षेच्या निकाला आधारे शिफारस करण्यात आलेल्या व खालील अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारामधून नामनिर्देशनाद्वारे (१) वयोमर्यादा : i. किमान वयोमर्यादा : १८ वर्षे पूर्ण. ii. कमाल वयोमर्यादा : खुल्या प्रवर्गातील व्यक्तींसाठी वयाच्या २८ वर्षांपेक्षा कमी व मागासवर्गीय प्रवर्गातील व्यक्तींसाठी ३३ वर्षांपेक्षा कमी; (२) शैक्षणिक पात्रता : माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण आणि अग्निशामक प्रशिक्षण पाठ्यक्रम उत्तीर्ण; सेवेत रुजू झाल्यानंतर १ वर्षाच्या आत हलके वाहन चालविण्याचा वैध परवाना धारण करणे बंधनकारक राहील.

अनुसूची-अ—चालू

(१)	(२)	(३)	(४)	(५)
				(३) शारिरीक अर्हता :- i. उंचीः किमान १६५ से.मी. (पुरुष) व किमान १५७ सें.मी. (महिला). ii. वजन : किमान ५० कि.ग्रॅ. (पुरुष) व किमान ४६ कि.ग्रॅ. (महिला). iii.छाती : किमान ८१ सें.मी. (साधारण) व किमान ८६ सें.मी. (फुगविल्यानंतर). (महिला उमेदवारांसाठी लागू नाही.) iv.दृष्टी : ६/६ (चश्माशिवाय) (४) या पदावर नामनिर्देशनाने नियुक्त होणारी व्यक्ती ही दोन वर्षांच्या कालावधीकरीता परिविक्षाधीन राहील. सदर परिविक्षाधीन कालावधी कमाल एका वर्षाने वाढविता येईल व या पदावर नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने सदर परिविक्षाधीन कालावधी यशस्वीपणे पूर्ण करणे आवश्यक आहे. एखाद्या व्यक्तीने विहित कालावधीत परिविक्षाधीन कालावधी यशस्वीपणे पूर्ण न केल्यास अथवा नियुक्त झालेल्या पदासाठी तो अयोग्य असल्याचे आढळल्यास सदर व्यक्तीच्या सेवा समाप्त होण्यायोग्य असतील. (५) नामनिर्देशनाने नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने प्रशिक्षण पूर्ण करून, विहित केलेली असल्यास विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. (६) नामनिर्देशनाने नियुक्त होण्यासाठी शिफारस होणाऱ्या व्यक्तीने, महाराष्ट्र नागरी सेवा (छोटे कुटुंब घोषणापत्र) नियम, २००५ अथवा शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या नियम आदेश अथवा संलेखानुसार छोट्या कुटुंबाबाबत घोषणापत्र सादर करणे आवश्यक आहे. छोटे कुटुंब घोषणापत्र सादर करण्याच्या दिनांकास दोन अपत्यांपेक्षा जास्त असणारी व्यक्ती शासकीय सेवेत नियुक्ती मिळण्यास अपात्र असेल. शासकीय सेवेत नियुक्ती मिळाल्यानंतर एखाद्या व्यक्तीस नियुक्तीच्या वेळेस अथवा त्यानंतर दोन पेक्षा जास्त अपत्ये असल्याचे सिद्ध झाल्यास शासन सेवेतील सदर पदावर कार्यरत राहण्यासाठी अपात्र ठरविण्यात येईल.
१०	चालक- यंत्रचालक (Driver Operator) (गट-क)	१६२	पदोन्नती	या पदावरील नियुक्त्या पुढील मार्गाने करण्यात येतील, - वाहन चालक या पदावर तीन वर्षापेक्षा कमी नसलेली सलग नियमित सेवा झालेल्या खाली नमुद शैक्षणिक पात्रता धारण करणाऱ्या योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने; शैक्षणिक पात्रता : i. माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण आणि अग्निशामक प्रशिक्षण पाठ्यक्रम उत्तीर्ण व जड वाहन चालविण्याचा वैध परवाना; ii. महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार मराठी व हिंदी भाषेची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक. iii. महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार संगणक अर्हता प्रचालन प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक.

अनुसूची-अ—चालू

(१)	(२)	(३)	(४)	(५)
११	वाहन चालक (अग्निशमन) (Driver- Fire)	१०	नामनिर्देशन - १०० %	या पदावरील नियुक्त्या पुढील मार्गाने करण्यात येतील, आयोग/निवडसमिती यांच्यामार्फत घेण्यात येणाऱ्या स्पर्धात्मक परिक्षेच्या निकाला आधारे शिफारस करण्यात आलेल्या व खालील अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारामधून नामनिर्देशनाद्वारे :- (१) वयोमर्यादा : i. किमान वयोमर्यादाः १८ वर्षे पूर्ण, ii. कमाल वयोमर्यादाः खुल्या प्रवर्गातील व्यक्तींसाठी वयाच्या २८ वर्षापेक्षा कमी व मागासवर्गीय प्रवर्गातील व्यक्तींसाठी ३३ वर्षांपेक्षा कमी; (२) शैक्षणिक पात्रताः i. माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण आणि हलके व्यावयायिक वाहन चालविण्याचा वैध परवाना ही अर्हता धारण करीत असलेली व्यक्ती; ii. महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार मराठी व हिंदी भाषेची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक. (३) शारिरीक अर्हता :- i. उंचीः किमान १६५ सें.मी. (पुरुष) व किमान १५७ सें.मी. (महिला). ii. वजन : किमान ५० कि.ग्रॅ. (पुरुष) व किमान ४६ कि.ग्रॅ. (महिला). छातीः किमान ८१ सें.मी. (साधारण) व किमान ८६ सें.मी. (फुगविल्यानंतर) (महिला उमेदवारांसाठी लागू नाही. iv. दृष्टी : ६/६ (चश्माशिवाय) (४) या पदावर नामनिर्देशनाने नियुक्त होणारी व्यक्ती ही दोन वर्षांच्या कालावधीकरीता परिविक्षाधीन राहील. सदर परिविक्षाधीन कालावधी कमाल एका वर्षाने वाढविता येईल व या पदावर नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने सदर परिविक्षाधीन कालावधी यशस्वीपणे पूर्ण करणे आवश्यक आहे. एखाद्या व्यक्तीने विहित कालावधीत परिविक्षाधीन कालावधी यशस्वीपणे पूर्ण न केल्यास अथवा नियुक्त झालेल्या पदासाठी तो अयोग्य असल्याचे आढळल्यास सदर व्यक्तीच्या सेवा समाप्त होण्यायोग्य असतील. (५) नामनिर्देशनाने नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने प्रशिक्षण पूर्ण करून, विहित केलेली असल्यास विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. (६) नामनिर्देशनाने नियुक्त होण्यासाठी शिफारस होणाऱ्या व्यक्तीने, महाराष्ट्र नागरी सेवा (छोटे कुटुंब घोषणापत्र) नियम, २००५ अथवा शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या नियम आदेश अथवा संलेखानुसार छोट्या कुटुंबाबाबत घोषणापत्र सादर करणे आवश्यक आहे. छोटे कुटुंब घोषणापत्र सादर करण्याच्या दिनांकास दोन अपत्यांपेक्षा जास्त असणारी व्यक्ती शासकीय सेवेत नियुक्ती मिळण्यास अपात्र असेल. शासकीय सेवेत नियुक्ती मिळाल्यानंतर एखाद्या व्यक्तीस नियुक्तीच्या वेळेस अथवा त्यानंतर दोन पेक्षा जास्त अपत्ये असल्याचे सिद्ध झाल्यास शासन सेवेतील सदर पदावर कार्यरत राहण्यासाठी अपात्र ठरविण्यात येईल.

अनुसूची-अ—चालू

(१)	(२)	(३)	(४)	(५)
१२	मुख्य मेक्यानिक कम ड्रायव्हर (Mechanic cum driver in-charge)	०१	पदोन्नती - १००%	पदोन्नती : फिटर कम ड्रायव्हर या पदावर नियमित ३ वर्ष सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवाजेष्ठता व योग्यता अधीन पात्रता या निकषावर पदोन्नतीने नियुक्ती करण्यात येईल. पदोन्नतीसाठी वयाची अट असणार नाही.
१३	फिटर कम ड्रायव्हर (Fitter cum driver)	१५	नामनिर्देशन - १००%	शैक्षणिक पात्रता : (१) माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण असावा. (२) आय.टी.आय. मधील मोटर मॅक्यानिकल / डिझेल मैक्यानिक / समकक्ष कोर्स उत्तीर्ण असावा. (३) जड वाहन चालविण्याचा कमीतकमी ३ वर्षाचा अनुभव असावा. (४) वैध जड वाहन चालविण्याचा परवाना आवश्यक, (५) मराठी लिहीता, वाचता व बोलता येणे आवश्यक. (६) एम.एस.सी.आय.टी. परीक्षा उत्तीर्ण आवश्यक. (७) वयोमर्यादा किमान १८ वर्ष कमाल ३३ वर्ष. आरक्षीत प्रवर्गासाठी किमान १८ वर्ष व कमाल ३८ वर्ष.
१४	इलेक्ट्रिशियन (Auto Electrician)	०२	नामनिर्देशन - १००%	शैक्षणिक पात्रता : (१) माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण असावा. (२) आय.टी.आय. मधील इलेक्ट्रीशियन / समकक्ष कोर्स उत्तीर्ण असावा. (३) वैध जड वाहन चालविण्याचा परवाना आवश्यक. (४) मराठी लिहीता, वाचता व बोलता येणे आवश्यक. (५) एम.एस.सी.आय.टी. परीक्षा उत्तीर्ण आवश्यकः (६) वयोमर्यादा किमान १८ वर्ष कमाल ३३ वर्ष. आरक्षीत प्रवर्गासाठी किमान १८ वर्ष व कमाल ३८ वर्ष.

डॉ. विपीन (भा.प्र.से.),
आयुक्त,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

नागपूर :
दिनांक ६ जुलै, २०२६.

———

भाग १-अ (ना .वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १५०.

अध्यक्षा, नगर परिषद, यांजकडून

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) अन्वये किरकोळ फेरबदल.

अधिसूचना

क्रमांक नपआ-६२१-२०२६.—

आर्वी शहराची सुधारित वाढीव क्षेत्राची अंतिम विकास योजना नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक टीपीएस-२४०९-२६१५-सीआर ३०७ (बी)-०९-नवि- ०९, दिनांक २१ ऑक्टोबर, २०११ ला मंजूर झाली असून दिनांक ०१ डिसेंबर, २०११ पासून अंमलात आलेली आहे.

आर्वी शहर विकास आराखड्यातील मौजा आर्वी, सर्व्हे क्रमांक २८९ ही २१०० चौ.मी. जागा 'व्यापारी संकूलाकरीता' (वाणिज्य प्रयोजन) आरक्षित करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम,१९६६ चे कलम ३७(१) अन्वये किरकोळ फेरबदल करणे आवश्यक आहे. सदर प्रकरणी क्षेत्र फेरबदल करावयाची जागा खालील प्रमाणे आहे.—

अनुसूची

अ. क्र.	जागेचा तपशील	प्रस्तावित फेरबदल
(१)	(२)	(३)
१	मौजा आर्वी, सर्व्हे क्रमांक २८९ ही २१०० चौ.मी. जागा आरक्षण क्रमांक ५१ अन्वये ' सांस्कृतिक केंद्र '	मौजा आर्वी, सर्व्हे क्रमांक २८९ ही २१०० चौ.मी. जागेवरील आरक्षण क्रमांक ५१ ' सांस्कृतिक केंद्र ' हे आरक्षण रद्द करून ' व्यापारी संकुलाकरीता ' आरक्षित करणे.

वरील प्रमाणे फेरबदल करणेबाबत नगर परिषद, आर्वी अंतर्गत सर्वसाधारण सभा ठराव क्र. १७, दिनांक १७ जून, २०२६ अन्वये ठरविले आहे. किरकोळ फेरबदल दर्शविणारा विकास योजना नकाशा नगर परिषदेच्या बांधकाम विभागात माहितीसाठी कार्यालयीन वेळेत खूला ठेवलेला आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ पोट-कलम (१) अन्वये कोणत्याही व्यक्ती कडून वरील किरकोळ फेरबदल बाबत सूचना व हरकती सदरची नोटीस शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द झालेल्या तारखेपासून ३० दिवसांचे आंत लेखी स्वरुपात नगर परिषदेकडे मागविण्यांत येत असून सूचना व आक्षेपांचा उक्त फेरबदल प्रस्ताव शासनाच्या मंजुरीसाठी सादर करण्यापूर्वी नगर परिषद, आर्वी आवश्यक विचार करेल.

स्वाती गुल्हाणे,
अध्यक्षा,
नगर परिषद, आर्वी.

आर्वी :
दिनांक १ जुलै, २०२६.

———

भाग १-अ (ना .वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १५१.

BY PRESIDENT, MUNICIPAL COUNCIL

Modification to the Development Plan under Section 37 (*1*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.—

NOTIFICATION

No. MCA-621-2026.—

Modification :- The Development Plan of Arvi has been sanctioned by Government of Maharashtra Urban Development Department *vide* Resolution No. TPS- 2409-2615-C.R.- 307 (B)-09-UD-9, dated 21st October, 2011 and came into force with effect on 1st December, 2011.

The Municipal Council, Arvi has decided to make Modification to the Development Plan for converting S.N. 289 admeasuring 2100.00 Sq. m. of mouja Arvi from Reservation No 51- Cultural Centre to 'Shopping Complex' under section 37 (*1*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. Land under Modification is as follows:-

SCHEDULE

Sr. No.	Land Description	Proposed Modification
(1)	(2)	(3)
1	Reservation No 51- Cultural Centre, S.N. 289 admeasuring 2100.00 Sq. m. of mouja Arvi.	S.N. 289 admeasuring 2100.00 Sq. m. of mouja Arvi from Reservation No 51- Cultural Centre to 'Shopping Complex'.

The Municipal Council, Arvi has decided to make modification mentioned above *vide* general meeting Resolution No. 17, dated 17th June, 2026. Necessary Plan showing the propoesd modification is kept in the office of Municipal Council, Arvi for public inspection during office hours. In pursuance of Section 37 sub-section (*1*) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 Suggestion/objection from any person affected there by with respect to the proposed modification are invited within 30 days from date of publication. This notice in *Government Gazette* will be considered by the Municipal Council, Arvi, before submitting it to the Government for sanction.

SWATI GULHANE,
President,
Municipal Council, Arvi.

Arvi :
Dated the 1st July, 2026.

पुढील अधिसूचना असाधारण राजपत्र म्हणून त्यांच्यापुढे दर्शविलेल्या दिनांकाला प्रसिद्ध झालेली आहे

२७

गुरूवार, जुलै १०, २०२५/आषाढ १९, शके १९४७

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ७६.

विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन, यांजकडून

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५

आदेश

क्रमांक एमयुएन १९(३)-कावि-४८९-२०२५.—

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ९ (२) मधील तरतूदीस अनुसरुन २०११ च्या जनगणनेची (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांचा मागास प्रवर्ग यांची लोकसंख्या विचारात घेऊन) नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ करीता **नागपूर** जिल्ह्यातील **नगरपरिषद कामठी** क्षेत्रासाठी एकूण निवडून येणा-या सदस्यांची संख्या तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे स्त्री सदस्यांची संख्या (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी असलेल्या सदस्य संख्येसह) आणि अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी आरक्षित सदस्यसंख्या निश्चित करण्यात येत आहे.

विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक नागपूर यांनी यापूर्वी सार्वत्रिक निवडणूक-२०२५ चे अनुषंगाने वरील नमूद नगरपरिषदेचे शासन राजपत्रात प्रसिध्द सदस्यसंख्या निश्चितीचे सर्व आदेश, शुध्दीपत्रके याद्वारे रद्द करण्यात आहे व मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ०६ मे, २०२५ रोजी दिलेल्या आदेशाचे अनुषंगाने महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी क्रमांक एमसीओ-२०२५/प्र.क्र.२४२/नवि-१४ दि. १६ जून, २०२५, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी क्रमांक एमसीओ-२०२५/प्र.क्र.२४२/नवि-१४ दि.०८/०७/२०२५ तसेच मा.आयुक्त तथा संचालक नवी मुंबई यांचे पत्र क्र.नपप्रस/सार्वत्रिक-निवडणूक/२०२५-२६/का-६/५३४३ दि.०८/०७/२०२५ नुसार दिलेल्या आदेश/निर्देशाप्रमाणे **नागपूर** जिल्हयातील खालील तक्त्यात नमूदप्रमाणे नगरपरिषदाची सार्वत्रिक निवडणूक घ्यावयाची आहे.

तक्ता

नगरपरिषद/ नगर पंचायतीचे नाव	लहान नागरी क्षेत्राचे नाव	लहान नागरी क्षेत्राचा वर्ग	एकूण निवडुन द्यावयाची सदस्य संख्या	रकाना (४) पैकी प्रवर्गासाठी राखुन ठेवलेली सदस्य संख्या				रकाना (४) पैकी स्त्रियांसाठी एकूण राखीव सदस्य संख्या	रकाना (९)पैकी स्त्रियांसाठी राखुन ठेवलेल्या जागांची प्रवर्गानुसार विभागणी			
				अनुसुचित जाती साठी	अनुसुचित जमाती साठी	नागरीकाच्या मागास प्रवर्गा साठी	सर्व साधारण		अनुसुचित जाती साठी (रकाना ५ पैकी)	अनुसुचित जमाती साठी (रकाना ६ पैकी)	नागरीकाच्या मागास प्रवर्गा साठी (रकाना ७ पैकी)	सर्व साधारण (रकाना ८ पैकी)
१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३
नप कामठी	कामठी	ब	३४	१०	१	९	१४	१७	५	०*	५	७

***टिप** :- मागील सार्वत्रिक निवडणुकीमध्ये नगरपरिषद कामठी येथील अनुसूचित जमाती करीता देय एक जागा अनुसूचित जमाती (महिला) करीता राखीव झालेली होती. मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे निर्देशानुसार यावेळी सदर अनुसूचित जमाती करीताची जागा अनुसूचित जमाती (सर्वसाधारण) करीता आरक्षित राहील.

नागपूर :
दिनांक १० जुलै, २०२५.

विजयलक्ष्मी बिदरी (भा.प्र.से.) ,
विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक,
नगरपरिषद प्रशासन, नागपूर.

भाग १-अ (असा.) (ना.वि.पु.) म. शा. रा., अ. क्र. ७७.

BY THE DIVISIONAL COMMISSIONER AND REGIONAL DIRECTOR,
MUNICIPAL ADMINISTRATION

MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965

ORDER

No.Mun-19(3)-CR-489-2025.—

Under section 9(2) of the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965 taking into consideration population figures of Census of India, 2011 (including the population of Scheduled Castes, Scheduled Tribes and Backward Classes of Citizens), The number of elected Councillors in respect of**, Municipal Council Kamptee** Area in **Nagpur District** is fixed as mentioned in the following table.

Similarly, the number of seats to be reserved for women (including the seats belonging to Scheduled Castes, Scheduled Tribes and Backward Classes of Citizens) and the number of seats to the reserved for Scheduled Castes, Scheduled Tribes and Backward Classes of Citizens are also fixed as mentioned in the table.

Divisional Commissioner and Regional Director Nagpur had earlier announced the results of the General Election-2025. all the orders and corrigendum issued by this office for fixing the number of members of the above-mentioned Municipal Councils/Nagarpanchayats published in the Government Gazette are hereby cancelled and the Hon'ble Supreme Court has given its order dated 06th May, 2025 pursuance to the order, the Government of Maharashtra, Urban Development Department, Ministry, Mumbai, *vide* order/direction No. MCO-2025/Pr.No.242/Navi-14 dated June 16, 2025; the Government of Maharashtra, Urban Development Department, Mantralaya, Mumbai *vide* No. MCO-2025/Pr.No.242/Navi-14 dated 08/07/2025 and the Hon'ble Commissioner and Director Navi Mumbai *vide* letter No. NPPRS/General Election/2025-26/Ka-6/5343 dated 08/07/2025, General elections are to be held in **Municipal Council Kamptee,** Nagpur district as mentioned in the table below.

TABLE

Name of Nagar Panchayat	Name of Smaller Urban Area	Class of Smaller Urban Area	No.of Elected Councillors	Out of column (4) No. of Seats Reserved For following category				Out of column (4) Total No.of seats reserved for women	Out of column (9) No.of seats reserved for women following Category			
				Scheduled Castes	Scheduled Tribes	Backward Classes of Citizens	General		Scheduled Castes {Out of col.5}	Scheduled Tribes {Out of Col.6}	Backward Classes Of Citizens {Out of col.7}	General {Out of col.8}
1	2	3	4	5	6	7	8	9	10	11	12	13
M.C.Kamptee	Kamptee	B	34	10	1	9	14	17	5	0*	5	7

*Note:- In the last General election, one seat in the Municipal Council Kamptee reserved for Scheduled Tribes (women). As per the directions of the Hon'ble State Election Commission, Maharashtra, the said Scheduled Tribe seat will be reserved for Scheduled Tribes (General) at this time.

Nagpur :
Dated the 10th July, 2025.

VIJAYALAKSHMI BIDARI (IAS),
Divisional Commissioner & Regional Director,
Municipal Administration, Nagpur.

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ७८.

विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन, यांजकडून

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५

आदेश

क्रमांक एमयुएन १९(३)-कावि-४९०-२०२५.—

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ९ (२) मधील तरतूदीस अनुसरुन २०११ च्या जनगणनेची (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांचा मागास प्रवर्ग यांची लोकसंख्या विचारात घेऊन) नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ करीता **नागपूर** जिल्ह्यातील **नगरपरिषद उमरेड** क्षेत्रासाठी एकूण निवडून येणा-या सदस्यांची संख्या तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे स्त्री सदस्यांची संख्या (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी असलेल्या सदस्य संख्येसह) आणि अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी आरक्षित सदस्यसंख्या निश्चित करण्यात येत आहे.

विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक नागपूर यांनी यापूर्वी सार्वत्रिक निवडणूक-२०२५ चे अनुषंगाने वरील नमूद नगरपरिषदेचे शासन राजपत्रात प्रसिध्द सदस्यसंख्या निश्चितीचे सर्व आदेश, शुध्दीपत्रके याद्वारे रद्द करण्यात आहे व मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ०६ मे, २०२५ रोजी दिलेल्या आदेशाचे अनुषंगाने महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी क्रमांक एमसीओ-२०२५/प्र.क्र.२४२/नवि-१४ दि. १६ जून, २०२५, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी क्रमांक एमसीओ-२०२५/प्र.क्र.२४२/नवि-१४ दि.०८/०७/२०२५ तसेच मा.आयुक्त तथा संचालक नवी मुंबई यांचे पत्र क्र.नपप्रस/सार्वत्रिक-निवडणूक/२०२५-२६/का-६/५३४३ दि.०८/०७/२०२५ नुसार दिलेल्या आदेश/निर्देशाप्रमाणे **नागपूर** जिल्ह्यातील खालील तक्त्यात नमूदप्रमाणे नगरपरिषदाची सार्वत्रिक निवडणूक घ्यावयाची आहे.

तक्ता

नगरपरिषद/नगर पंचायतीचे नाव	लहान नागरी क्षेत्राचे नाव	लहान नागरी क्षेत्राचा वर्ग	एकूण निवडुन द्यावयाची सदस्य संख्या	रकाना (४) पैकी प्रवर्गासाठी राखुन ठेवलेली सदस्य संख्या				रकाना (४) पैकी स्त्रियांसाठी एकूण राखीव सदस्य संख्या	रकाना (९)पैकी स्त्रियांसाठी राखुन ठेवलेल्या जागांची प्रवर्गानुसार विभागणी			
				अनुसुचित जाती साठी	अनुसुचित जमाती साठी	नागरीकाच्या मागास प्रवर्गा साठी	सर्व साधारण		अनुसुचित जाती साठी (रकाना ५ पैकी)	अनुसुचित जमाती साठी (रकाना ६ पैकी)	नागरीकाच्या मागास प्रवर्गा साठी (रकाना ७ पैकी)	सर्व साधारण (रकाना ८ पैकी)
१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३
नप उमरेड	उमरेड	ब	२७	४	४	७	१२	१४	२	२	४	६

नागपूर :
दिनांक १० जुलै, २०२५.

विजयलक्ष्मी बिदरी (भा. प्र. से.),
विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक,
नगरपरिषद प्रशासन, नागपूर.

भाग १-अ (असा.) (ना.वि.पु.) म. शा. रा., अ. क्र. ७९.

BY THE DIVISIONAL COMMISSIONER AND REGIONAL DIRECTOR,
MUNICIPAL ADMINISTRATION

MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965

ORDER

No.Mun-19(3)-CR-490-2025. —

Under section 9(2) of the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965 taking into consideration population figures of Census of India, 2011 (including the population of Scheduled Castes, Scheduled Tribes and Backward Classes of Citizens), The number of elected Councillors in respect of**, Municipal Council Umred** Area in **Nagpur District** is fixed as mentioned in the following table.

Similarly, the number of seats to be reserved for women (including the seats belonging to Scheduled Castes, Scheduled Tribes and Backward Classes of Citizens) and the number of seats to the reserved for Scheduled Castes, Scheduled Tribes and Backward Classes of Citizens are also fixed as mentioned in the table.

Divisional Commissioner and Regional Director Nagpur had earlier announced the results of the General Election-2025. all the orders and corrigendum issued by this office for fixing the number of members of the above-mentioned Municipal Councils/Nagarpanchayats published in the Government Gazette are hereby cancelled and the Hon'ble Supreme Court has given its order dated 06th May, 2025 pursuance to the order, the Government of Maharashtra, Urban Development Department, Ministry, Mumbai, *vide* order/direction No. MCO-2025/Pr.No.242/Navi-14 dated June 16, 2025; the Government of Maharashtra, Urban Development Department, Mantralaya, Mumbai *vide* No. MCO-2025/Pr.No.242/Navi-14 dated 08/07/2025 and the Hon'ble Commissioner and Director Navi Mumbai *vide* letter No. NPPRS/General Election/2025-26/Ka-6/5343 dated 08/07/2025, General elections are to be held in **Municipal Council Umred,** Nagpur district as mentioned in the table below.

TABLE

Name of Nagar Panchayat	Name of Smaller Urban Area	Class of Smaller Urban Area	No.of Elected Councillors	Out of column (4) No. of Seats Reserved For following category				Out of column (4) Total No.of seats reserved for women	Out of column (9) No.of seats reserved for women following Category			
				Scheduled Castes	Scheduled Tribes	Backward Classes of Citizens	General		Scheduled Castes {Out of col.5}	Scheduled Tribes {Out of Col.6}	Backward Classes Of Citizens {Out of col.7}	General{Out of col.8}
1	2	3	4	5	6	7	8	9	10	11	12	13
M.C. Umred	Umred	B	27	4	4	7	12	14	2	2	4	6

Nagpur :
Dated the 10th July, 2025.

VIJAYALAKSHMI BIDARI (IAS),
Divisional Commissioner & Regional Director,
Municipal Administration, Nagpur.

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ८०.

विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन, यांजकडून

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५

आदेश

क्रमांक एमयुएन १९(३)-कावि-४९१-२०२५.—

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ९ (२) मधील तरतूदीस अनुसरुन २०११ च्या जनगणनेची (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांचा मागास प्रवर्ग यांची लोकसंख्या विचारात घेऊन) नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ करीता **नागपूर** जिल्ह्यातील **नगरपरिषद काटोल** क्षेत्रासाठी एकूण निवडून येणा-या सदस्यांची संख्या तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे स्त्री सदस्यांची संख्या (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी असलेल्या सदस्य संख्येसह) आणि अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी आरक्षित सदस्यसंख्या निश्चित करण्यात येत आहे.

विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक नागपूर यांनी यापूर्वी सार्वत्रिक निवडणूक-२०२५ चे अनुषंगाने वरील नमूद नगरपरिषदेचे शासन राजपत्रात प्रसिध्द सदस्यसंख्या निश्चितीचे सर्व आदेश, शुध्दीपत्रके याद्वारे रद्द करण्यात आहे व मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ०६ मे, २०२५ रोजी दिलेल्या आदेशाचे अनुषंगाने महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी क्रमांक एमसीओ-२०२५/प्र.क्र.२४२/नवि-१४ दि. १६ जून, २०२५, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी क्रमांक एमसीओ-२०२५/प्र.क्र.२४२/नवि-१४ दि.०८/०७/२०२५ तसेच मा.आयुक्त तथा संचालक नवी मुंबई यांचे पत्र क्र.नपप्रस/सार्वत्रिक-निवडणूक/२०२५-२६/का-६/५३४३ दि.०८/०७/२०२५ नुसार दिलेल्या आदेश/निर्देशाप्रमाणे **नागपूर** जिल्ह्यातील खालील तक्त्यात नमूदप्रमाणे नगरपरिषदाची सार्वत्रिक निवडणूक घ्यावयाची आहे.

तक्ता

नगरपरिषद/नगर पंचायतीचे नाव	लहान नागरी क्षेत्राचे नाव	लहान नागरी क्षेत्राचा वर्ग	एकूण निवडुन द्यावयाची सदस्य संख्या	रकाना (४) पैकी प्रवर्गासाठी राखुन ठेवलेली सदस्य संख्या				रकाना (४) पैकी स्त्रियांसाठी एकूण राखीव सदस्य संख्या	रकाना (९)पैकी स्त्रियांसाठी राखुन ठेवलेल्या जागांची प्रवर्गानुसार विभागणी			
				अनुसुचित जाती साठी	अनुसुचित जमाती साठी	नागरीकाच्या मागास प्रवर्गा साठी	सर्व साधारण		अनुसुचित जाती साठी (रकाना ५ पैकी)	अनुसुचित जमाती साठी (रकाना ६ पैकी)	नागरीकाच्या मागास प्रवर्गा साठी (रकाना ७ पैकी)	सर्व साधारण (रकाना ८ पैकी)
१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३
नप काटोल	**काटोल**	ब	२५	४	२	७	१२	१३	२	१	४	६

नागपूर :
दिनांक १० जुलै, २०२५.

विजयलक्ष्मी बिदरी (भा. प्र. से.),
विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक,
नगरपरिषद प्रशासन, नागपूर.

भाग १-अ (असा.) (ना.वि.पु.) म. शा. रा., अ. क्र. ८१.

BY THE DIVISIONAL COMMISSIONER AND REGIONAL DIRECTOR,
MUNICIPAL ADMINISTRATION

MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965

ORDER

No.Mun-19(3)-CR-491-2025. —

Under section 9(2) of the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965 taking into consideration population figures of Census of India, 2011 (including the population of Scheduled Castes, Scheduled Tribes and Backward Classes of Citizens), The number of elected Councillors in respect of, **Municipal Council Katol** Area in **Nagpur District** is fixed as mentioned in the following table.

Similarly, the number of seats to be reserved for women (including the seats belonging to Scheduled Castes, Scheduled Tribes and Backward Classes of Citizens) and the number of seats to the reserved for Scheduled Castes, Scheduled Tribes and Backward Classes of Citizens are also fixed as mentioned in the table.

